प्रेस नोट तारीख ०३/०८/२०१७

## अल्पवयीन मुलीला पळवुन नेणा-या आरोपीस मुंढवा पोलीस स्टेशन पुणे शहर यांचेकडुन अटक

मुंढवा पोलीस ठाणे गु.र.न.१३०/२०१७ भादवि कलम ३६३ मधील एका अल्पवयीन मुलीस पळवुन नेल्याबाबत गुन्हा नोंद असुन दाखल गुन्हयांचा तपास करीत असतांना निष्पन्न आरोपी नामे दिलीप रामचंद्र गुरदाळकर रा दत्त चौक मुंढवा पुणे मुळ पत्ता धनेगाव ता.देवणी जि. लातुर यांने पळवुन नेल्याचे निष्पन्न झाले. सदर आरोपीचा व पीडीत मुलींचा शोध घेत असतांना तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक प्रताप ल.गिरी यांना गोपनिय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, यातील पिडीत मुलगी व निष्पन्न आरोपी हे औरंगाबाद येथील मध्यवर्ती बसस्थानक येथे त्यांच्या मित्राला भेटावयास येणार आहे. बातमी मिळाली त्यावेळी पोलीस उपनिरीक्षक गिरी हे एक अधिक एक दिवस किरकोळ रजेवर त्यांचे मुळगावी जाफ्राबाद जि.जालना येथे गेले होते. तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक गिरी यांनी आमचेशी तात्काळ दुरध्वनीद्वारे संपर्क साधुन बातमीचा आशय सांगितला तेव्हा आम्ही त्यांना योग्य त्या सुचना देवुन स्थानिक पोलीस स्टेशनच्या मदतीने कारवाई करण्याबाबत आदेशीत केले.

त्याप्रमाणे पोलीस उपनिरीक्षक श्री गिरी हे त्यावेळी त्यांचे चुलतीचा सावडण्यांचा कार्यक्रमात होते. तो कार्यक्रम अर्धवट सोडुन कर्तव्य महत्वाचे समजुन ते जाफ्राबाद जि. जालना येथुन तात्काळ औरंगाबाद येथे पोहचले. तेथे त्यांनी गुप्त बातमीदाराची भेट घेवुन त्यांचेकडुन परिपुर्ण माहीती घेवुन पोलीस उपनिरीक्षक श्री गिरी यांनी औरंगाबाद येथील क्रांती चौक पोलीस स्टेशन येथे जाऊन पोलीस मदत मांगितली. क्रांती चौक पोलीस स्टेशन येथुन त्यांना मदतीसाठी पोलीस उपनिरीक्षक श्री सुर्यवंशी व त्यांचा स्टाफ असे मिळाले. त्यांचे मदतीने श्री गिरी यांनी मध्यवर्ती बसस्थानक औरंगाबाद शहर येथे सापळा रचला असता त्यांना परत माहीती मिळाली की, आरोपी व पिडीत मुलगी हे सिडको बसस्टँडच्या पाठीमागील स्टॉपवर किंवा त्या अगोदर उतरणार आहेत. अशी माहीती मिळाल्यांने परत पोलीस उपनिरीक्षक प्रताप गिरी यांनी संबधित बसच्या डेपोतुन बसचा क्रमांक प्राप्त केला. सदर गाडी क्रमांक एम एच २० ३९७६ या गाडीमधुन पिडीत मुलगी व निष्पन्न आरोपी हे येणार असल्याची बातमी असल्याने पीएसआय गिरी व क्रांती चौक पोलीस स्टेशन औरंगाबाद येथील स्टाप असे मिळुन हॉटेल यशवंत, बिड बायपास औरंगाबाद या ठिकाणी थांबुन बातमीप्रमाणे बसची खात्री करुन सदर बसच्या पाठीमागे खाजगी वाहनाने पाठलाग करुन मुंकुदवाडी बसस्टॉप औरंगाबाद या ठिकाणी आरोपी व पीडीत मुलीस वरील स्टाफच्या मदतीने दिनांक ०१/०८/२०१७ रोजी २०/५० वाजता ताब्यात घेतले व त्यांना मुंढवा पोलीस स्टेशन पुणे शहर येथे आणले असुन दाखल गुन्हयांत अटक करण्यात आले आहे.

Scanned by CamScanner

दाखल गुन्हयांचा तपास करीत असतांना आरोपीने त्याचे जवळील दोन्ही मोबाईल लोणीकाळभोर परिसरात फेकुन दिले तसेच कोणत्याही बँकेशी ,गॅस एजन्सीशी संपर्क न साधता किंवा मोबाईल द्वारे कोणतेही संभाषण केले नाही आरोपीने "एक था टायगर" हा हिंदी चित्रपट पाहुन त्यामध्ये दाखविल्याप्रमाणे मोबाईल फोनचा गुन्हा झाल्यानंतर करण्याचे टाळले होते त्यामुळे आरोपीचा ठावठिकाणा लागणे कठिण असतांना तपास अधिकारी प्रताप गिरी व पो.ना./६७३४ सचिन कोकरे यांनी आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने व प्रत्यक्ष तपास व गुप्त बातमीदारामार्फत कौशल्याने तपास करुन आरोपी पर्यंत पोहोचण्यात यशस्वी झाले.

सदरची कामगिरी मा.पोलीस उपआयुक्त श्री दिपक साकोरे,परिमंडळ-४,पुणे शहर मा.सहा.पोलीस आयुक्त श्री समिर शेख वानवडी विभाग पुणे शहर, मा.वरिष्ट पोलीस निरीक्षक श्री अनिल पात्रुंडकर व पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांचे प्रत्यक्ष मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्री प्रताप ल.गिरी , पो.ना./६७३४ सचिन कोकरे ,पो.ना.२५३२ जगताप,पो.शि.७०२३ विभुते,पो.शि/८९३९ दिपक रोडे यांनी औरंगाबाद येथील क्रांतीचौक पोलीस स्टेशनचे पीएसआय सुर्यवंशी व त्यांच्या स्टाफच्या मदतीने केली आहे. दाखल गुन्हयांचा पुढील तपास सहा.पोनि. अनिता खेडकर मुंढवा पोस्टे. हे करीत आहे.

3/8/17.

(अनिल पात्रुडकर)
वरिष्ट पोलीस निरीक्षक,
मुंढव पोलीस स्टेशन,पुणे शहर

Scanned by CamScanner